जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग-४१६८१२
(सामान्य शाखा)
सत्यमेव जयते
दूरध्वनी क्रमांक ०२३६२-२२८६०८, २२८८४७ ईमेल-colloffice@gmail.com

<u>अति तात्काळ</u>

क्र.साशा/सेतू/करोना/2020
जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
दिनांक 09/04/2020

प्रति,

1. गटविकास अधिकारी, सर्व पंचायत समिती कार्यालय, जि. सिंधुदुर्ग
2. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगरपंचायत, जि. सिंधुदुर्ग

विषय - पोस्ट ऑफिस मार्फत AEPS च्या माध्यमातून बँकेतील पैसे काढणे संदर्भात.

संदर्भ - अधीक्षक डाकघर, सिंधुदुर्गनगरी यांचे पत्र क्र. एस.पी./covid-19/AEPS/पत्र व्यवहार/19-20 दि. 08/04/2020

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये पोस्ट कार्यालयात **"इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या (IPPB) AEPS"** सेवेव्दारे कोणत्याही बँक खात्यातील पैसे ग्राहकांना फक्त आधार क्रमांकाव्दारे जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये किंवा पोस्टमनमार्फत घरपोच देण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सेवेमुळे ग्राहकांना घराबाहेर न पडता किंवा ATM/BANK च्या रांगेत उभे न राहता पैसे काढता येतात. यामध्ये एका वेळेस जास्तीत जास्त रु. 10,000/- पर्यंत रक्कम काढता येईल.

तरी आपणास याव्दारे आदेशित करण्यात येते की, पोस्ट ऑफिस कार्यालयाकडील **"इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या (IPPB) AEPS"** या सेवेची जिल्हयातील ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रात व्यापक प्रसिध्दी करुन जिल्हयातील लोकांना पोस्ट ऑफिस मार्फत सुरु केलेल्या या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(के.मंजुलक्ष्मी)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन सिंधुदुर्ग

**प्रत:**

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग.
2) जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग.
3) अधीक्षक डाकघर, सिंधुदुर्गनगरी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.
   2/- या कामी आपले विभागामार्फत जिल्हास्तरीय नोडल ऑफिसरची नियुक्ती करुन त्यांचे नाव व दुरध्वनी क्रमांक या कार्यालयास कळवावे.
4) जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग यांना माहिती तथा याबाबत जाहीर प्रसिध्दी देणेसाठी सादर.